# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३८९-२२ दिनांक २१/१२/२०२२

## स्टे इन लॉजींग आणि बोर्डीगवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाने कारवाई करुन २ पिडित मुलींची केली सुटका.

दिनांक २०/१२/२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, स्टे इन लॉजींग आणि बोर्डीग (लॅन्ड मार्क लॉजिंग), विष्णु मंदिराजवळ, मिरा गावठाण, काशिमिरा या लॉजिंगचे मॅनेजर व वेटर बिलबरप्रसाद गुप्ता असे लॉजमध्ये येणाऱ्या पुरुष गिहाईकांनी वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केल्यास ते एका इसमाचे वेश्यागमनाची व रुम भाडे रक्कम ठरवुन घेवुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दोन बोगस गिहाईक व पंच यांना स्टे इन लॉजींग आणि बोर्डीग (लॅन्ड मार्क लॉजिंग), विष्णु मंदीराजवळ, मिरागावठाण, काशिमिरा या ठिकाणी पाठवुन मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळुन पंच व पोलीस पथकासह दिनांक २०/१२/२०२२ रोजी १७.४५ वा. छापा टाकला. सदर छापा कारवाईमध्ये स्टे इन लॉजचे वेटर बिलबरप्रसाद गुप्ता व वेटर इंद्रदेव यादव याने वेश्यागमनाच्या मोबदल्यात बोगस गिहाईकांना वेश्यागमनाकरीता ०२ मुली पुरविल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सापळयातील मुद्देमाल व इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०२ पिडित मुलींची सुटका केली. तसेच स्टे इन लॉजींग आणि बोर्डीगचे मॅनेजर १) श्रीनिवास शेट्टी, वय-५१ वर्ष, २) वेटर बिलबरप्रसाद गुप्ता, वय-२८ वर्ष ३) वेटर इंद्रदेव यादव, वय-४१ वर्ष व पाहिजे आरोपी चालक/मालक यांचे विरुध्द सहापोउपनि उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ८९०/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री अविनाश अंबुरे, पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्रीमती पद्‌मजा बढे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) अती. कार्यभार मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, सपोनि मंगेश बुराडे- मनुष्यवध तपास पथक, सहापोउपनि/उमेश पाटील, रामचंद्र एस. पाटील, पोशि/ केशव शिंदे, चा.पोहवा/सम्राट गावडे, महिला/मसुब अपर्णा गायकवाड, सर्व नेम-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर, पोहवा/विनोद राऊत नेम-सहा.पो.आयुक्त गुन्हे कार्यालय व मपोहवा/नम्रिता यादव-मनुष्यवध तपास पथक यांनी केली आहे.